# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र
१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १६ ऑगस्ट २०१६.

## नगरपरिषद निवडणुकांसाठी मतदार यादीत
## नाव नोंदविण्याकरिता शेवटचा पंधरवडा

३१ ऑगस्टपर्यंत नावे नोंदविण्याचे आवाहन

मुंबई, दि. १६: राज्यात डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या १९५ व १९ नवनिर्मित नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत नावे नोंदविण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंतच असल्यामुळे आता शेवटचा पंधरवडा शिल्लक आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी त्वरित नावे नोंदवावित, असे आवाहन राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे केले.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, नगरपरिषद व नगरपंचायतींच्या आगामी निवडणुकांसाठी १० सप्टेंबर २०१६ रोजी अस्तित्त्वात येणारी विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी वापरली जाणार आहे. त्यामुळे १ जानेवारी २०१६ रोजी किंवा तत्पूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र नागरिकांनी ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव नोंदविणे आवश्यक आहे. तरच त्यांना नगरपरिषद व नगरपंचायतींच्या आगामी निवडणुकांमध्ये मतदान करता येईल; तसेच यापूर्वीच मतदार यादीत नावे असलेल्या मतदारांच्या नावांत किंवा पत्त्यांतील तपशिलात बदल असल्यास त्यासाठीदेखील अर्ज करता येईल. त्याचबरोबर दुबार नावे, स्थलांतरितांची नावे अथवा मृत व्यक्तींची नावे वगळण्यासाठीसुद्धा अर्ज करता येईल.

**निवडणूक होणाऱ्या नगरपरिषद/नगरपंचायतींची विभागनिहाय संख्या: कोकण-** २२, **पुणे-** ५१, **नाशिक-** ३०, **औरंगाबाद-** ४८, **अमरावती-** ३४, **नागपूर-** २९, **एकूण-** २१४.

----00-0-----

(Jagdish More, PRO, SEC)